। बुधवार दि. १६ जुलै २०२५ । वर्ष -१३ । मुंबई

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत । अंक

Follow Us on Social Media

www.theglobaltimes.org

EPaper

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHMAR /2012/44621

# विवेक वाहिनी ही समाजाला प्रगल्भ करणारी चळवळ : प्रा. हिर्डेकर

**माणगाव** : विद्यार्थ्यांमध्ये मानवता धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विवेक वाहिनीचे योगदान मोठे आहे. विवेक वाहिनीच्याद्वारे आयोजित केलेल्या व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, लिंगभेद, पर्यावरण, संविधान प्रबोधन, नेतृत्व विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन यासारख्या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करणे आवश्यक आहे. विवेक वाहिनी ही समाजाला प्रगल्भ करणारी चळवळ असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूरचे जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. टी. एम. हिर्डेकर यांनी केले.



ते विवेकानंद कॉलेजमधील विवेक वाहिनी विभाग, आयक्यूएसी विभाग आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होते. या कार्यशाळेचे उद्घाटन अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विवेक वाहिनी चळवळीतून धगधगते विद्यार्थी घडविणे गरजेचे आहे. विविध कल्पना व योजना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी विवेक वाहिनी मदत करीत असते. विवेक वाहिनीच्या माध्यमातून तरुणांनी स्वतःमध्ये विचार करण्याची क्षमता वृध्दिंगत केली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात कृष्णात स्वाती यांच्या मार्गदर्शनाखाली गटचर्चा घेण्यात आली. दुसऱ्या सत्रात विभावरी नकाते आणि डॉ. संतोष जेठीथोर यांनी 'विवेक वाहिनी का व कशी' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित सुस्वा प्रार्थना व रोपट्याला पाणी घालून करण्यात आली. प्रास्ताविक अंनिस कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रविण चौगुले यांनी केले. आभार अंनिसचे राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती यांनी मानले तर सूत्रसंचालन रेश्मा खाडे यांनी केले.

कार्यशाळेचे संयोजन डॉ. सरिता शिंदे यांनी केले. या कार्यशाळेस आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रमोद शिंदे, डॉ. संदीप पाटील, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि विविध महाविद्यालयातील विवेक वाहिनी विभागाचे समन्वयक उपस्थित होते.

# कंपनी सेक्रेटरी हा करिअरसाठीचा राजमार्ग : जयदीप पाटील

**कोल्हापूर :** आजच्या युगात कंपनी सेक्रेटरी हे करिअरसाठी एक उत्तम क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या मेहनतीने अभ्यास केला आणि परीक्षा पास झाल्या तर चांगल्या कंपनीमध्ये उच्च दर्जाच्या नोकरीच्या संधी मिळतील, असे मत 'आयसीएसआय'चे चेअरमन जयदीप पाटील यांनी व्यक्त केले.

विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित कंपनी सेक्रेटरी करिअर व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

पाटील म्हणाले, कला, वाणिज्य, विज्ञान या कोणत्याही शाखेतील विद्यार्थी कंपनी सेक्रेटरी पदवी प्राप्त करू शकतो. कायदेशीर सल्लागार, मानव संसाधन प्रबंधक, व्यवसाय अनुपालन नियंत्रण, संतुलन ठेवण्याचे काम कौशल्य उत्कृष्ट कंपनी सेक्रेटरीचे आहे. आजच्या कार्पोरेट जगामध्ये प्रशासक म्हणून त्याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. प्रा. शिल्पा भोसले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. एन. ढगे यांनी स्वागत केले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. अश्विनी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. बी. एस. कोळी यांनी आभार मानले.

16/7/25

तरुण भारत

बुधवार १६ जुलै २०२५

# प्रा. डॉ. एम. जी. पाटील सेवानिवृत्तीनंतर झाले एम. ए.

**हुपरी :** शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.शिक्षण घेण्यासाठी वयाची अट नसते. हे प्रत्यक्षात दाखवून दिले आहे. रेंदाळ येथील प्रा. डॉ. एम. जी. पाटील यांनी. डॉ. पाटील यांचा



जन्म शेतकरी कुटुंबात झाला. घरात पूर्वीपासून शिक्षणाची परंपरा नव्हती. त्यांनी निश्चय करून प्राथमिक शिक्षण रेंदाळमध्ये माध्यमिक शिक्षण हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेत पूर्ण केले. त्यानंतर कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज मध्ये बी. एस. सी. पदवी घेऊन पुढे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये एम. एस. सी. पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झालेनंतर पदार्थ विज्ञानामध्ये शिक्षण घेतल्यानंतर विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये व वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी केली. नोकरी करत असताना यु. जी. सी. च्या फेनोथिपमध्ये एम. फील पूर्ण करून १९९४ ला पी. एचडी प्राप्त केली. ३४ वर्षानंतर सेवानिवृत्त झाले. २०२३ मध्ये रुकडी कॉलेजमध्ये एम. ए. अर्थशास्त्र विषयासाठी रेग्युलर प्रवेश घेतला. दररोज चार तास अभ्यास करून ही पदवी प्राप्त केली.